# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ

गोंधणी रोड, आकाशवाणी केंद्राजवळ यवतमाळ 445001

जा.क्र.जिशिप्रसंयवत/शिक्षकअ.क.स्पर्धा/2025-26/ 695 दि.06.11.2025

प्रति,

1)मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)

2)शिक्षणाधीकारी प्राथ/माध्य, जिल्हा परिषद, (सर्व)

3)गट शिक्षणाधीकारी, पंचायत समिति(सर्व) जिल्हा परिषद, यवतमाळ

**विषय:** समजपूर्वक वाचन राज्यस्तरीय स्पर्धेची सुधारित नियमावली सादर करणेबाबत.

**संदर्भ:** मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे यांचे पत्र क्र. साव्यावि/राशैसंवप्रप/शिक्षकस्पर्धा/2025-26/1/1490273/2025 दि.10.10.2025.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वे, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित,अंशत: अनुदानित प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामधील शिक्षक, कर्मचारी, डायट मधील अधिकारी,कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षिय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी तालुका विभाग आणि राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष 2025-26 करण्यात येणार आहे. यामध्ये एकूण 43 स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

यवतमाळ जिल्ह्याला समजपूर्वक वाचन स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. या स्पर्धेच्या तालुका, विभाग आणि राज्यस्तरीय मूल्यांकनाचे निकष आणि स्पर्धेची सुधारित नियमावली पुढीलप्रमाणे आहे.

**स्पर्धा नियमावली:**

1. सदर स्पर्धेचे आयोजन केवळ **मराठी** माध्यमात करण्यात येईल.
2. स्पर्धेचा कालावधी 60 मिनिटांचा असेल.
3. सदर स्पर्धेत विचारल्या जाणारा प्रश्न प्रकार लघुत्तरी आणि दिर्घोत्तरी स्वरूपाचा असेल.
4. प्रत्येक स्पर्धकाला प्रत्येकी एक गद्य आणि एक पद्य उतारा व त्याखाली प्रश्न या स्वरूपाची प्रश्न पत्रिका आणि स्वतंत्र उत्तर पत्रिका पुरवली जाईल.
5. ही स्पर्धा एकूण 100 गुणांची असेल. सदर स्पर्धा तालुका, विभाग आणि राज्यस्तरावर लेखी स्वरूपात आयोजित करण्यात येईल.
6. समज पूर्वक वाचनामध्ये गद्य व पद्य यांचे योग्य आकलन, मुख्य कल्पना व पूरक माहिती ओळखण्याची क्षमता व अनुमान काढण्याची क्षमता आणि विश्लेषण करण्याची क्षमता यावर 40 गुण असतील.
7. उत्तराच्या स्वरूपात केलेले लेखनाची गुणवत्ता, रचना व सुसंगतता, स्पष्टता आणि संक्षिप्तता, उत्तराची भाषा, प्रश्न सोडविण्यासाठी घेतलेला वेळ, एकूण सोडविलेल्या प्रश्नाची संख्या यासाठी एकूण 60 गुण असतील.
8. तालुका, विभाग आणि राज्य या तीनही स्तराकरिता स्वतंत्र गद्य व पद्य उतारे प्रश्नांसह आयोजक जिल्हयाकडून स्पर्धेच्या एकदिवस पूर्वी सर्व डायट प्राचार्य यांच्या कार्यालयीन मेलवर पाठविण्यात येतील.
9. स्पर्धा संपल्यानंतर लगेच परीक्षकांमार्फत मूल्यांकन करून प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे विजेता स्पर्धकाची माहिती तालुका आयोजकाने संबंधित जिल्हयाच्या डायट कार्यालयाला त्याच दिवशी सादर करावी.
10. संबंधित डायट प्राचार्य यांनी या स्पर्धेतील विजेत्यांची माहिती स्पर्धेच्या दिवशी संबंधित विभागीय डायट कार्यालय आणि आयोजक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण यवतमाळ यांना पाठवावी.

11. विभाग स्तरावर सुद्धा वरीलप्रमाणे स्पर्धेचे आयोजन व कार्यवाही करून पाच विजेत्या स्पर्धकांची माहिती आयोजक विभागीय जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ यांना स्पर्धेच्या दिवशी पाठवावी.
12. या स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ यांच्याकडून करण्यात येणार आहे.
13. या पत्रासोबत या स्पर्धेचा मूल्यमापन तक्ता देण्यात येत आहे.

| समजपूर्वक आकलन क्षमता | | | | | | लेखन कौशल्य | | | वेळ व्यवस्थापन व पूर्तता | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | स्पर्धकाचे नाव | गद्य/पद्य समज (10 गुण ) | मुख्य कल्पना-पूरक माहिती ओळखणे | अनुमान काढण्याची क्षमता (10 गुण ) | विश्लेषण व मुल्यांकन क्षमता (10 गुण | स्पष्टता व संक्षिप्तता (10 गुण ) | रचना व सुसंगतता (10 गुण ) | व्याकरण आणि भाषा (10 गुण ) | प्रश्नाची पूर्तता(15 गुण ) | वेळेचे व्यवस्थापन (15 गुण ) | 100 पैकी प्राप्त गुण |
| 1. | | | | | | | | | | | |
| 2. | | | | | | | | | | | |
| 3. | | | | | | | | | | | |
| 4. | | | | | | | | | | | |

(डॉ. रमेश राऊत)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
यवतमाळ

प्रतिलिपी:
मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.